दिव्य मराठी

चाळीसगाव 07-07-2025

# गुरुकुल शाळेच्या पर्यावरण दिंडीने वेधले लक्ष



**चाळीसगाव** | येथील गुरुकुल ट्रस्ट संचालित पुष्पाताई जोशी बालविकास मंदिर, ह.जो. विद्यालय ,तात्यासाहेब सामंत विद्यालय यांच्यावतीने दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम विद्यालयात सकाळी संस्थेचे अध्यक्ष प्रा.ल.वि. पाठक,सचिव डॉ .हरिश दवे, संस्थेचे शिक्षण विभाग प्रमुख चंद्रशेखर विंचुरकर सर्व मुख्याध्यापक व उपस्थित पालक व शिक्षक यांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले. यानंतर ज्ञानोबा माऊली तुकाराम हा गजर करत पालखी सोहळा प्रारंभ झाला. यप्रसंगी वनपरिक्षेत्र अधिकारी शीतल नगराळे यांनी विद्यार्थ्यांना विविध रोपे वाटप करून वृक्षारोपण व संवर्धनाचे महत्व पटवून दिले.

दिव्य मराठी चाळीसगाव 13-09-2025

# विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा केला संकल्प

## नगरपरिषदेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन



नगरपरिषदेच्यावतीने आयोजित कार्यशाळेस उपस्थित सामंत विद्यालयातील विद्यार्थी.

**प्रतिनिधी** | चाळीसगाव

नगर परिषदेच्या वतीने तात्यासाहेब सामंत विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे मार्गदर्शन नगर परिषदेचे मुख्याधिकारी सौरभ जोशी यांनी केले.कार्यक्रमाच्या समारोपात विद्यार्थ्यांनी 'माझी वसुंधरा' शपथ घेत पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संकल्प केला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांना नगर परिषदेतील विविध विभागांचे दैनंदिन कामकाज कसे पार पाडले जाते याची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. आरोग्य विभागातून शहर समन्वयक करण चव्हाण यांनी घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता व पर्यावरण याबाबत मार्गदर्शन केले. जन्म-मृत्यू प्रमाणपत्र व डिजिटल नोंदी याबाबत कुलदीप राजपूत यांनी माहिती दिली. पाणीपुरवठा विभागातून दीपक देशमुख यांनी शुद्धीकरण प्रक्रिया व पाणीपुरवठ्याची पद्धत समजावून सांगितली.

कर विभागातील गोपाल शिंदे, सागर पुसदेकर व सुदर्शन पवार यांनी कर संकलन, पाणीपट्टी व घरपट्टी विषयी मार्गदर्शन केले. विद्युत विभागातून प्रशांत ठाकुर यांनी पथदिवे व सौरदिव्यांची माहिती दिली.

दिव्य मराठी चाळीसगाव 01-09-2025

# गुरुकुल परिवाराच्या वतीने बाप्पाची जल्लोषात स्थापना

## ऑपरेशन सिंदूरच्या देखाव्यातून सैनिकांचा शौर्यगौरव

शहर प्रतिनिधी | चाळीसगाव

श्रद्धा, उत्साह आणि संस्कृतीचा मनमोहक संगम घडवत गुरुकुल ट्रस्ट संचालित पुष्पाताई जोशी बालविकास मंदिर, हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय, तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालय या विभागातर्फे विद्यालयाच्या आवारात पर्यावरणपूरक शाडू माती पासून तयार केलेल्या बालगणेशाची स्थापना मोठ्या भक्तिमय व जल्लोषात करण्यात आली. यावेळी ऑपरेशन सिंदुरच्या देखाव्यातून सैनिकांचा शौर्यगौरव करण्यात आला आहे.

आगमन मिरवणुकीची सुरुवात हनुमानवाडी येथील प्राचीन हनुमान मंदिरापासून झाली. पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या बैलगाडीतून बाप्पाची आगमन मिरवणूक जल्लोषात काढण्यात आली.यावेळी आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. मिरवणुकी दरम्यान विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्याचे अप्रतिम सादरीकरण करत सर्वांना थिरकवले. तर सर्वजण ढोलपथकाच्या गरजणाऱ्या तालांवर गणपती बाप्पा मोरया चा जयघोष करत बेधुंद होऊन नाचण्यात दंग झाले होते. यामुळे मुख्य रस्त्यांवर भक्तिरसाचा आनंद पसरला होता. गुरुकुलच्या राजाची स्थापना चेतन चव्हाण यांच्या शुभहस्ते सपत्नीक करण्यात आली.

### भारतीय सैनिकांचा शौर्यगौरव यावर आधारित संकल्पना

यावर्षी गणेशोत्सवाची संकल्पना ही ऑपरेशन सिंदुर च्या माध्यमातून भारतीय सैनिकांचा शौर्यगौरव यावर आधारित आहे. त्याचबरोबर संत श्री ज्ञानेश्वर महाराजांची सप्त शतकोत्तर जयंती आणि संत तुकाराम महाराजांच्या त्रिशतकोत्तर वैकुंठ गमन सोहळ्याचे दर्शन घडवणे अशी एकाचवेळी देशभक्ती आणि भक्तीचा संगम साधण्याची आकर्षक संकल्पना साकारण्यात आली आहे.विशेष म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने गणपतीसाठी एक रुपया वर्गणी दिली. त्या वर्गणीतून गणपती बाप्पांची मूर्ती विराजमान झाली.

दिव्य मराठी

चाळीसगाव 12-11-2025

# चाळीसगाव शहरामध्ये रांगोळीच्या माध्यमातून मतदानावर जनजागृती

प्रतिनिधी | चाळीसगाव



रांगोळीच्या माध्यमातून मतदानाविषयी जनजागृती करताना विद्यार्थी.

शहरात मतदानाविषयी जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहे. त्यानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक विद्यालय व पंचायत समितीतर्फे प्रभाग क्रमांक नऊमध्ये मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीत विद्यालयातील विद्यार्थी, मुख्याध्यापक ए. बी. पाटील यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

या उपक्रमांतर्गत पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी विलास भोई व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रभागामध्ये फिरून नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांनी घोष वाक्यांच्या माध्यमातून लोकशाहीचा उत्सव साजरा करा, मतदान करून आपला हक्क बजावा असा संदेश दिला. पंचायत समितीच्या शिक्षण विभागांतर्गत मतदान जनजागृती अभियानांतर्गत तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालयातील नववीच्या विद्यार्थिनींनी नगरपालिकेच्या परिसरात आकर्षक रांगोळी काढली. या रांगोळीच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचा संदेश देण्यात आला. मतदान करा, देश घडवा अशा आशयाच्या रांगोळ्यांनी परिसर सजला होता. या वेळी चाळीसगावचे उपविभागीय अधिकारी प्रमोद हिले, नगरपालिकेचे मुख्याधिकारी सौरभ जोशी, नायब तहसीलदार संदेश निकम उपस्थित होते. जान्हवी पाटील, यशस्वी पाटील, दुर्गेश्वरी पवार, इशिका पाटील, लावण्या पवार, नंदिनी सोनार, अवंती कोष्टी व अनुष्का दुसे यांनी सहभाग नोंदवला. या उपक्रमाला विद्यालयाचे कला शिक्षक अमोल येवले यांनी मार्गदर्शन केले. दोन्ही उपक्रमामुळे जागृती निर्माण होण्यास मदत झाली.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
07 Jul 2025 - Page 4



## गुरूकुल शाळा

चाळीसगाव। प्रतिनिधी

गुरुकुल ट्रस्ट संचलित पुष्पाताई जोशी बालविकास मंदिर, ह.जो. प्राथ.विद्यालय, ता.सा.माध्य. विद्यालय व गुरुकुल कम्प्युटर अक्ॅडमी यांच्यावतीने आषाढी एकादशी निमित्ताने दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष प्रा.ल. वि.पाठक, सचिव डॉ.हरिश दवे, संस्थेचे शिक्षण विभाग प्रमुख चंद्रशेखर विंचुरकर, सर्व मुख्याध्यापक व उपस्थित पालक व शिक्षक यांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले. यानंतर भगव्या पताका आसमंतात फडकत ज्ञानोबा माऊली तुकाराम हा गजर करत पालखी सोहळा प्रारंभ झाला. हिरापूर रोडने जावून छ. शिवाजी महाराज चौकात विद्यार्थ्यांनी आकर्षक रिंगण सोहळा संपन्न केला. रिंगणात पाऊलीचे विविध प्रकार घेण्यात आले. यानंतर स्टेशन रोडने जात दुसरे रिंगण शासकीय विश्रामगृहाजवळ पार पडले. विद्यार्थ्यांनी प्रसंगी विठ्ठल रखुमाई व विविध संतांच्या भूमिका केल्या होत्या.

## गुरुकुल ट्रस्ट परिवार

चाळीसगाव येथील गुरुकुल ट्रस्ट परिवारातील पुष्पाताई जोशी बालविकास मंदिर, हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय, तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालय, गुरुकुल कॉम्प्युटर अकॅडमी, गुरुकुल क्रीडा प्रबोधिनी, गुरुकुल आयटी इन्स्टिट्यूट यांच्यातर्फे आयोजित कार्यक्रमाला आमदार मंगेश चव्हाण, गुरुकुल ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. ल. वि. पाठक, सचिव डॉ. हरिष दवे, बापजी ग्रामीण रुग्णालयाचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेच्या विद्यालयांच्या वार्षिक नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येऊन योगगुरू मधुकर कासार यांचा सत्कार करण्यात आला.

# सामंत विद्यालयाचे हँडबॉल स्पर्धेत सुयश

प्रतिनिधी | चाळीसगाव

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय शासकीय जिल्हास्तरीय हँडबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या जिल्हास्तरीय हँडबॉल स्पर्धेत तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालयाची १४ वर्षे वयोगट मुलींचा संघ सहभागी झाला होता.स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे विद्यालयाची हँडबॉल खेळाडू कुमारी श्रावणी मनोहर भोपे हीचे धुळे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेत निवड करण्यात आली.



श्रावणी भोपे

श्रावणी हि धुळे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रवाना झालेली आहे. श्रावणी हिला विद्यालयाच्या क्रीडा प्रशिक्षक व राष्ट्रीय हँडबॉल खेळाडू कुमारी जान्हवी गोरे यांचे मार्गदर्शन लाभले. श्रावणी भोपे हिचे विद्यालयाचे विश्वस्त, मुख्याध्यापक यांच्यातर्फे कौतुक करण्यात आले.

पुण्य नगरी



# गुरुकुलच्या बाल वारकऱ्यांचा हरिनामाचा जयघोष

**चाळीसगाव :** गुरुकुल ट्रस्ट संचालित पुष्पाताई जोशी बालविकास मंदिर व गुरुकुल काम्प्युटर अकॅडमीतर्फे आषाढीनिमित्त बाल वारकऱ्यांच्या पालखीचे संस्थेचे अध्यक्ष प्रा. ल. वि. पाठक, सचिव डॉ. हरिश दवे, शिक्षण विभाग प्रमुख चंद्रशेखर विंचुरकर, सर्व मुख्याध्यापक, पालक व शिक्षकांच्या हस्ते पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौक व शासकीय विश्रामगृहाजवळ विद्यार्थ्यांनी आकर्षक रिंगण केले. देवजी पटेल परिवारातर्फे खाऊ व पाणी वाटप करण्यात आले. याप्रसंगी फॉरेस्टच्या रेंजर शीतल नगराळे यांनी विद्यार्थ्यांना विविध रोपे वाटप केली. सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

Jalgaon Edition

Jul 08, 2025 Page No. 09

Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
22 Jun 2025 - Page 7



▶▶ चाळीसगाव । प्रतिनिधी

# चाळीसगाव

पुष्पाताई जोशी बालविकास मंदिर, ह.जो.प्राथमिक विद्यालय, ता.सा. माध्य विद्यालय, गुरुकुल कॉम्प्युटर अकॅडमी, गुरुकुल क्रीडा प्रबोधिनी, गुरुकुल आयटी इन्स्टिट्यूट यांच्या तर्फे दि.२१ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन महोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेच्या विद्यालयांच्या वार्षिक नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आ.मंगेश चव्हाण, गुरुकुल ट्रस्टचे अध्यक्ष प्रा.ल.वि.पाठक, सचिव डॉ.हरिश दवे तसेच बापजी रुग्णालयाचे अध्यक्ष व विश्वस्त डॉ.संदिप देशमुख, भाजपाचे शहराध्यक्ष नितीन पाटील आदि उपस्थित होते. प्रथम सूर्यमंत्राने सुरवात होऊन बॉडीवॉर्मअप करण्यात आले. यानंतर सूर्यनमस्कार होऊन योगासनांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

यात ताडासन, वृक्षासन, चक्रासन, त्रिकोणासन, गरुडासन, पश्चिमोतानासन, वज्रासन, वक्रासन, शशांकासन असे एकूण १८ आसन घेण्यात आले त्यानंतर प्राणायाम घेण्यात आला. शेवटी शांतीमंत्र म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

दिव्य मराठी

चाळीसगाव 24-06-2025

# गुरुकुल ट्रस्ट परिवारतर्फे योग महोत्सवाचे आयोजन



**चाळीसगाव** | येथील गुरुकुल ट्रस्ट परिवार चाळीसगाव यांच्या सर्व शाखा पुष्पाताई जोशी बालविकास मंदिर,ह.जो. प्राथमिक विद्यालय, ता.सा. विद्यालय, गुरुकुल कॉम्प्युटर अकॅडमी, गुरुकुल क्रीडा प्रबोधिनी,गुरुकुल आयटी इन्स्टिट्यूट यांच्या तर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन महोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार मंगेश चव्हाण, गुरुकुल ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. ल. वि. पाठक, सचिव डॉ. हरिश दवे तसेच बापजी रुग्णालयाचे अध्यक्ष व विश्वस्त उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेच्या विद्यालयांच्या वार्षिक नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन झाले. यानंतर योगगुरू मधुकर कासार यांचा सत्कार करण्यात आला. प्रथम सूर्य मंत्राने सुरवात होऊन बॉडीवॉर्मअप करण्यात आले. यानंतर सूर्यनमस्कार होऊन योगासनांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

पुण्य नगरी

# जिल्हाभरात योगदिन उत्साहात साजरा

### सगाव तर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



चाळीसगाव : गुरुकुल ट्रस्ट परिवार चाळीसगाव यांच्या सर्व शाखा पुष्पाताई जोशी बालविकास मंदिर, ह.जो. प्राथमिक विद्यालय, ता. सा. माध्य विद्यालय, गुरुकुल कॉम्प्युटर अकॅडमी, गुरुकुल क्रीडा प्रबोधिनी, गुरुकुल आयटी इन्स्टिट्यूट यांच्या तर्फे दि.२१ जून २०२५ शनिवार रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन महोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार मंगेश चव्हाण, गुरुकुल ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. ल. वि. पाठक, सचिव डॉ. हरिश दवे तसेच बापजी रुग्णालयाचे अध्यक्ष व विश्वस्त उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेच्या विद्यालयांच्या वार्षिक नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन झाले. यानंतर योगगुरू मधुकर कासार यांचा सत्कार करण्यात आला. प्रथम सूर्यमंत्राने सुरवात होऊन बॉडीवॉर्मअप करण्यात आले.यानंतर सूर्यनमस्कार होऊन योगासनांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. यात १८ आसन घेण्यात आले. त्यानंतर प्राणायाम घेण्यात आला. शेवटी शांतीमंत्र म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

### चैतन्य तांडा जि.प. उच्च प्राथमिक शाळा

चाळीसगाव : तालुक्यातील चैतन्य तांडा नंबर ४ गावात योग दिन कार्यक्रमास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. योग वर्गास शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सरपंच व सदस्य, विकासोचे चेअरमन, केंद्रप्रमुख तसेच गावातील शिक्षण प्रेमी, मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते. सर्वांनी योगाचे प्रात्यक्षिक करून योगाभ्यासाचा सराव केला.



### धनदाई महाविद्यालय

अमळनेर : येथील धनदाई कला व विज्ञान महाविद्यालयात योग दिन महाविद्यालयाच्या प्रांगणात सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींनी योग साधना करुन साजरा केला. महिला पतंजली योग पीठाच्या जिल्हा कोषाध्यक्षा रत्ना भदाणे, तालुका प्रभारी कामिनी पवार, मीडिया प्रभारी माधुरी पाटील, संवाद प्रभारी भारती कोळी, संघटक तथा मुख्याध्यापिका निवेदिता कापडणेकर यांच्या मार्गदर्शनात योगासने करून विद्यार्थ्यांसह शिक्षकांना महत्व पटवून दिले. याप्रसंगी धनदाई संस्थेचे अध्यक्ष डी. डी पाटील यांनी मार्गदर्शन केले. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष तथा प्राचार्य के. डी. पाटील, खजिनदार शैलेंद्र पाटील, प्राचार्य डॉ. एच. एम पाटील यांनी सहभाग नोंदवला. या वेळी शांतिनिकेतन प्राथमिक, जय योगेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राध्यापक, शिक्षक, धनदाई महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक प्रा.डॉ शैलेश पाटील यांनी केले.



### बालविकास प्राथमिक विद्यामंदिर

भडगाव : योग दिनानिमित्त येथील बालविकास प्राथमिक विद्यामंदिरात विद्यार्थ्यांसह शिक्षक, मुख्याध्यापकांनी एकत्र येऊन योगासने आणि प्राणायाम केले. मुख्याध्यापिका भारती रामकुवर यांनी योगाचे महत्त्व सांगितले. सुनीता सूर्यवंशी, अमोल बिऱ्हाडे, अर्चना खांडेकर, सागर महाजन, अंजली सोनवणे, सचिन महाजन, रेखा महाजन, रेखा पाटील, सुजाता महाजन या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या वेळी उपशिक्षक विकास झोडगे यांनी योगशिक्षकांची भूमिका निभावत योग, प्राणायम याबाबत मार्गदर्शन केले.

### सरस्वती विद्या मंदिर



अमळनेर : विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्य, निरोगीपणा आणि सजगता वाढवण्यासाठी योग सर्वोत्तम आहे, असे प्रतिपादन सरस्वती विद्या मंदिरात मुख्याध्यापक रणजित शिंदे यांनी योग दिवस साजरा करतांना केले. याप्रसंगी योग दिनाचे महत्त्व आणि योगाचे फायदे याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देत मुख्याध्यापक शिंदे यांनी सहकारी ऋषिकेश महाळपूरकर यांच्यासह योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. याप्रसंगी कामगार कल्याण मंडळाचे केंद्रप्रमुख अजय पाटील, केंद्र सेवक राकेश चौधरी यांनी मुख्याध्यापक शिंदे व महाळपूरकर यांच्यासह शिक्षकांचा सत्कार केला. कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह शिक्षक आनंदा पाटील, संगीता पाटील, गीतांजली पाटील, शीतल पाटील, उपशिक्षक धर्मा धनगर आदींनी सहकार्य केले.

### पंकज विद्यालय



चोपडा : येथील पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात योग दिनानिमित्त २१ जूनला सकाळी ७ वाजता सर्व विद्यार्थ्यांना प्रार्थना हॉलमध्ये एकत्र करुन यू-ट्यूबवरून सर्व पालकांना योग शिक्षक उदय गुजर यांच्या मार्गदर्शनात योगासने व प्राणायाम प्रात्यक्षिकाद्वारे योग दिवस साजरा करण्यात आला. संस्थाध्यक्ष डॉ. एस. पी. बोरोले यांच्या मार्गदर्शनात १९ ते २१ दरम्यान योग शिबिर योग शिक्षक योगेश चौधरी व गायत्री शिंदे यांनी घेत प्रशिक्षण दिले. शिबिरात संस्थेतील ३००पेक्षा अधिक शिक्षक, प्राध्यापक, संचालक व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. समारोपप्रसंगी संस्थाध्यक्ष डॉ. एस. पी. बोरोले यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे उपाध्यक्ष अविनाश राणे, संचालक पंकज बोरोले यांनी सहभाग घेत मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक व्ही. आर. पाटील यांनी माहिती दिली. कार्यक्रमास शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

सकाळी ११:३० वाजता त स्वत: व अभिसिंग रूपचंद राठोड हे दोघे मिळून रेशनचा तांदूळ सुमारे एक क्विंटल माल काळ्याबाजारात विक्रीसाठी घेऊन जात असताना भानुदास ओंकार पवार यांनी व गावकऱ्यांनी रंगेहाथ पकडले.

## कंटेनरने दिलेल्या धडकेत एक ठार

**पाळधी, ता. धरणगाव :** येथील महामार्गावर दुचाकीला कंटेनरने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार ठार झाला आहे. पळून जाणाऱ्या कंटेनरचा पाळधी पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले आहे. अमोल बाबूराव पाटील (हतनूर, ता. भुसावळ) असे मयताचे नाव आहे. रविवारी संध्याकाळी ५ वाजेच्या सुमारास येथील महामार्गावरून मुसळी येथे दुचाकीने (एमएच १९ एआर ५८२४) जात असताना कंटेनर (एमपी ०९ जीएच ५००३)ने धडक दिली. अपघातात पाटील यांचा जागीच मृत्यू झाला.

थांबलेले भाविक रिमझिम पावसात चिंब भिजल्याचे दिसून आले.

**भडगाव तालुक्यात अर्धा तास पाऊस**

**भडगाव :** शहरासह तालुक्यात रविवारी दुपारी अर्धा तास पाऊस झाला. कुठे तुरळक पाऊस झाला. मात्र, या पावसामुळे खरीप हंगामातील कपाशी, मका, ज्वारी, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, भुईमूग यांसह इतर पिकांना वाचविण्यासाठी मोठा दिलासा मिळला आहे.

दमदार पाऊस बरसावा, अशी शेतकऱ्यांना मोठी अपेक्षा आहे. सायंकाळी पावसाचे वातावरण होते.

पारोळा शहरातील रस्ते मुसळधार पावसामुळे जलमय

## बाळद परिसरातही दुपारपासून पाऊ

**१** बाळद (ता. पाचोरा) परिसरात गेल्या आठ- वरुणराजाने रविवारी दुपारी २ वाजेपासून जवळपास तासभर हा पाऊस बरसत होता. असे अ पावसाच्या प्रतीक्षेत आहे.

**२** सायगाव (ता. चाळीसगाव) येथे दुपारी रि पावसात जोर नव्हता. गणेशपूर परिसरात झाला. त्यामुळे पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भा

**३** भडगाव तालुक्यातील कजगाव येथे रवि बरसत होता. काही वेळच हा पाऊस ब वातावरण ढगाळ होते. मात्र जोरदार पावसाचे

**१४ मध्यम**

**प्रकल्प अद्यापही कोरडेठाक असून चाळीसगाव परिसरातील या प्रकल्पांना अद्यापही जोरदार पावसाची प्रतीक्षाच आहे. सध्या काही प्रकल्पात मृतसाठाच आहे.**

**पारोळा शहराला मुसळधार पावसाने झोडपले..**



चाळीसगावातील सिग्नल चौकात रविवारी आषाढी एकादशीनिमित्त रिंगण करून हरिनामाचा गजर करताना गुरुकुल परिवारातील पारंपारिक वेषातील बाल वारकरी. (छाया : जिजाबराव वाघ)

**मस्ट READ**

# यूरिया वितरणात वाढ; ७१ टक्के